MHWR06-001952-2021

## – न्याय निर्णय –

**(आज दिनांक २३ जून, २०२६ रोजी पारित)**

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान (यापुढे भा.दं.वि.) चे कलम २८९ अन्वये खटला चालविण्यात आला.

२) सदरच्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे कलम २८९ अन्वये गुन्हा क्र. १४५/२०२१ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास ना.पो.कॉ. उमेश ठोंबरे यांनी केला. साक्षीदारांचे बयाण नोंदविण्यात आले, जखमीचे कागदपत्र तयार करण्यात आले, आरोपीला अटक करण्यात आले. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

३) आरोपीविरुध्द नि. क्र. ८ वरिल नमुद कलमाप्रमाणे विवरणपत्र तयार करण्यात आले. विवरणपत्रामधील आरोप आरोपीला वाचुन व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल न करता संपरिक्षेची तयारी दर्शविली.

४) अभियोग पक्षाची हकीकत, अभियोग पक्षाने व आरोपीच्या वकिलांनी केलेल्या युक्तिवादानुसार सदर केसच्या योग्य निष्कर्षाप्रत पोहचण्यासाठी खालील मुद्दे विचारात घेण्यात आले व खालीलप्रमाणे नमुद कारणासहित निष्कर्ष दिलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक १२/०६/२०२१ रोजी दुपारी ०३.०० ते ०३.२० वाजताच्या सुमारास मौजा येरला, ता. हिंगणघाट येथे आरोपीने त्याचे ताब्यातील पाळीव कुत्राबाबत कोणतीही उपाय न घेतल्यामुळे त्याचे पाळीव कुत्र्याने फिर्यादी रत्नाकर दामोधर वावरे यांच्या डाव्या हाताच्या पंजाला व अंगठ्याजवळील बोटाला चावून जखमी केले आणि त्याद्वारे भा.द.वि. चे कलम २८९ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | **अंतिम निर्णयाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

५) आरोपीविरुध्द दोष सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने साक्षीदार नामे रत्नाकर दामोधरराव वावरे (फिर्यादी) यांना नि.क्र.८ पुढे तपासले.

**मुद्दा क्र. १ करिता –**

६) दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकण्यात आला. भा.दं.वि.चे कलम २८९ गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षास खालील बाबी सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने त्याचे ताब्यातील पाळीव कुत्राबाबत कोणतीही उपाय न घेतल्यामुळे त्याचे पाळीव कुत्र्याने फिर्यादी रत्नाकर दामोधर वावरे यांच्या डाव्या हाताच्या पंजाला व अंगठयाजवळील बोटाला चावून जखमी केले.

७) अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या पुराव्यात सा.क्र.१–रत्नाकर दामोधरराव वावरे (फिर्यादी) यांनी असे कथन केले आहे की, ते आरोपीला ओळखतात. ते त्यांचे गावात त्यांचे वार्डात राहतात. त्यांचे घरी पांढ–या रंगाचा कुत्रा आहे. त्यांना घटनेबद्दल आठवत नाही. त्यांनी रागाच्या भरात आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली होती. तोंडी फिर्याद व छापील फिर्याद वरील सह्या त्यांनी कबूल केल्या परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे सांगीतले. अभियोग पक्षाने सुचनात्मक प्रश्न विचारले असता सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी कबूल केले की, त्यांचा आरोपीसोबत आपसी समझोता झाला आहे. त्याबाबत त्यांनी नि.क्र.११ वर पुर्सीस दाखल केली आहे.

८) एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार क्र.१ फिर्यादी रत्नाकर दामोधरराव वावरे यांनी त्यांच्या फिर्याद मधील संपूर्ण मजकुर अमान्य केला आहे. अभियोगपक्षाने साक्षीदाराचा उलटतपास घेतला, मात्र तरीही आरोपीविरुध्द गुन्ह्यात गुंतविणारा पुरावा पटलावर आणू शकला नाही. एकंदरीत आरोपीवरील गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरावा अभिलेखावर आलेला नाही. उलट तपासा दरम्यान त्यांनी हा खटला न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड केल्याचे मान्य केले आहे. पुराव्यावरुन आरोपीने त्याचे ताब्यातील पाळीव कुत्र्याबाबत कोणतीही उपाय न घेतल्यामुळे त्याचे पाळीव कुत्र्याने फिर्यादी रत्नाकर दामोधर वावरे यांच्या डाव्या हाताच्या पंजाला व

अंगठ्याजवळील बोटाला चावून जखमी केले या बाबीस पुष्टी मिळत नाही. उलट तपासा दरम्यान त्यांनी हा खटला न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड नि.क्र.११ नुसार केल्याचे मान्य केले आहे.

**<u>मुद्दा क्र. ०२ करिता</u> –**

९) फिर्यादी यांच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, सदर प्रकरणात फिर्याद कायद्यातील तरतुदीप्रमाणे सिध्द झाली नाही. अशा परिस्थितीत फिर्यादीचा पुरावा आरोपीला दोषी धरण्या इतपत पुरेसा नाही. म्हणून अभियोगपक्ष आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकामी अपयशी ठरला आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र. २ च्या दाखल खालील आदेश पारित करित आहे.

**<u>...आ दे श...</u>**

१. **आरोपी बंडु हनुमान हाडके** यांना भारतीय दंड विधानाचे कलम २८९ खालील गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम–२५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जमानत व वैयक्तिकबंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीला कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रमाणे रक्कम रु. ७५००/– ची जमानत द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

NEELAM JAIKISHOR PETHE
Digitally signed by NEELAM JAIKISHOR PETHE
Date: 2026.06.23 14:39:48 +0530

**दिनांक – २३/०६/२०२६**
**हिंगणघाट**

**(श्रीमती निलम जे. पेठे)**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**(कोर्ट नं. १), हिंगणघाट**

## प्रमाणपत्र

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – कु. एम.जी.मेहरे,
(ग्रेड–३)